

घरचा स्वाद,
घरची शुध्दता...
शुद्ध खा.. स्वस्थ रहा
म्हशीचे व गायीचे साजुक तुप
मे. नवलमल दौलतराम, बॉम्बेलॉज खाली, आग्रा रोड, धुळे
फोन : (02562) 238661 email : navalgheedhule@gmail.com



# आपला महाराष्ट्र

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

मूल्य २.००

WWW.APLAMAHARASHTRA.IN

POST REGD.No./DHL/53/24-26

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.१७६ ■ मंगळवार ३१ मार्च २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४



बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108


## शालार्थ आयडी घोटाळ्यात अशोक खरातचा हात? शिक्षण विभाग मात्र नरोबा-कुंजरोवाच्या भुमिकेत

**नाशिक, दि.३०- राज्यभर गाजलेल्या शालार्थ आयडी घोटाळ्यात भोंदूबाबा अशोक खरातचा सहभाग असल्याचा संशय वर्तवण्यात येत आहे. नाशिक आर्थिक गुन्हे शाखेकडून अशोक खरातचा भाऊ दिलीप खरातची चौकशी होण्याची शक्यता आहे. दिलीप खरातचा शालार्थ आयडी खरा की खोटा, याचा तपास पोलीस करणार आहेत. त्यामुळे शालार्थ आयडी प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेच्या चौकशीत धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता आहे. मात्र, सध्यातरी शिक्षण विभाग नरोबा-कुंजरोबाच्या भुमिकेत आहे. यातून तत्कालीन शिक्षण मंत्री दीपक केसरकरांच्या समोरील अडचणी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

शेकडो महिलांचे लैंगिक शोषण आणि आर्थिक फसवणुकीच्या आरोपांमुळे आधीच चर्चेत असलेला भोंदूबाबा अशोक खरात आता आणखी एका गंभीर प्रकरणात अडकण्याची शक्यता आहे. शालार्थ आयडी घोटाळ्यात त्याचा सहभाग असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्याच्या भावाला मिळालेल्या आयडीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, २०२२ साली तत्कालीन शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्या कार्यकाळात अशोक खरातने आपल्या भावाला शालार्थ आयडी मिळवून दिल्याची चर्चा आहे. यामुळे शिक्षण विभागात खळबळ उडाली आहे.

**शालार्थ आयडी घोटाळा?**

अशोक खरातचा भाऊ दिलीप खरात सिन्नर तालुक्यातील बारागाव पिंपरी येथील न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मध्ये शिक्षक आहे. मात्र त्याला मिळालेला शालार्थ आयडी खरा की खोटा, याबाबत आता संशय निर्माण झाला आहे. या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप झाल्याची चर्चा असून शिक्षण विभागातील काही फाईल्स अशोक खरातच्या दबावाखाली मंजूर केल्याची चर्चा रंगली आहे.

**आर्थिक गुन्हे शाखेची चौकशी**

नाशिक आर्थिक गुन्हे शाखेकडून या प्रकरणाची चौकशी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दिलीप खरात याची चौकशी होऊ शकते. तसेच या प्रकरणात आणखी धक्कादायक माहिती समोर (पान ४ वर)


भगवान महावीर जयंतीच्या शुभेच्छा!

भगवान महावीर जयंती निमित्त सर्वांना शुभेच्छा!
-दै.आपला महाराष्ट्र


✻ धुळे- महावीर जयंती निमित्त शहरासह जिल्ह्यात आज विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातून भव्य मिरवणुकीचे देखील नियोजन करण्यात आले आहे.

## धुळे जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह गारपीट पिकांसह भाजीपाला, फळबागांचे नुकसान





**धुळे, दि.३०-वातावरणात अचानक बदल झाल्याने सायंकाळी साडेपाचच्या सुमारास धुळे शहरासह जिल्ह्यात बेमोसमी पाऊस झाला. जिल्ह्यातील काही भागात लहान बोराच्या आकाराची गारपीट झाली. वादळी वाऱ्यामुळे शहरातील काही भागात उभारण्यात जाहिरात फलक कोसळले. ढगांचा गडगडाट आणि विजांच्या कडकडाटामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंताजनक वातावरण निर्माण झाले. रब्बी हंगामातील काढणीला आलेली पिके, भाजीपाला, फळबागांचे काही प्रमाणात नुकसान झाले. हवामान खात्याच्या अंदाजानुसार येत्या दोन दिवसात वादळी वाऱ्यासह बेमोसमी पाऊस होणार असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. दरम्यान, वादळी वारे वाहण्यापूर्वीच शहरासह जिल्ह्याच्या बहुसंख्य भागात वीज वितरण कंपनीने वीज पुरवठा खंडीत केला. सुमारे दोन तास वीज पुरवठा खंडीत राहिल्याने सर्वांनाच त्रास झाला.**

आ.पाटील यांचे आवाहन

धुळे तालुक्यातील कुसूंबा, आनंदखेडे, नेर, देऊर, नगावसह विविध भागात गारपीट आणि वादळी पावसाच्या (पान ४ वर)



## संविधानाचा अपमान करणाऱ्याविरूध्द संविधान संरक्षण समितीची निदर्शने

**धुळे, दि.३०- पौराणिक कथांचे वाचन करणाऱ्या धुळ्यातील राजीव झा यांनी अमळनेर येथे कथावाचन करीत असताना संविधानाचा अपमान केला आहे. त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच राज्यातील सर्वच कथित कथा वाचन करणाऱ्या भोंदू बाबांच्या विरोधात कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करणारे निवेदन संविधान संरक्षण समितीतर्फे सोमवारी जिल्हा प्रशासनास देण्यात आले. तत्पुर्वी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात निदर्शने करण्यात आली.**

संविधान संरक्षण समितीतर्फे भोंदू प्रवचनकारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करत जिल्हा प्रशासन मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले, विविध प्रवचनकारांवर गंभीर आरोप करत फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली. धुळे (पान ४ वर)

## स्वीकृत पाठोपाठ महापालिकेत स्थायी, महिला समिती सदस्यांची निवड



**धुळे, दि.३०- महापालिकेच्या विशेष सभेत सोमवारी सात स्विकृत सदस्यांची निवड झाल्याचे अधिकृतपणे जाहीर करण्यात आले. त्यात भाजपच्या पाच, राष्ट्रवादी-शिवसेना शिंदे गट आणि एम.आय.एम.च्या एका सदस्याचा समावेश आहे. याशिवाय स्थायी समितीवर सोळा, महिला बालकल्याण समितीवर अकरा जणांची निवड करण्यात आली.**

जानेवारीत झालेल्या महापालिका निवडणूकीत बहुमत मिळविण्यासाठी भाजपच्या स्थानिक नेत्यांनी मोठी कसरत केली. तेव्हा अनेकांना स्विकृत नगरसेवक केले जाईल, असे आश्वासन देण्यात आले होते. आता पाच जणांनी निवड झाली. पण, ही निवड पाच वर्षांसाठी आहे की एका वर्षासाठी हे मात्र अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्याबाबत सत्ताधारी भाजपचेच पदाधिकारी तर्क-वितर्क लढवीत आहे. याशिवाय स्थायी समितीच्या आणि महिला बालकल्याण समितीच्या सभापती पदासाठी आता इच्छूकांना प्रयत्न करावे लागणार आहेत.

**स्विकृत सदस्यत्व पाच की एक वर्ष**

धुळे महापालिकेच्या ७४ जागांसाठी १५ जानेवारी २०२६ ला मतदान झाले आणि १६ जानेवारीस निकाल लागला. त्यात भाजपने पन्नास जागा मिळविल्या. त्यानंतर सहा फेब्रुवारीस महापौरपदाची माळ मायादेवी परदेशी यांच्या गळ्यात पडली. त्यानंतर स्विकृत नगरसेवक म्हणून कुणाला संधी मिळते, विषय समित्यांचे सभापती कोण होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. सोमवारी त्याबाबत काहीशी परिस्थिती स्पष्ट झाली. स्वीकृत नगरसेवकात भाजपने ओमप्रकाश खंडेलवाल, गुलशन उदासी, नरेश चौधरी, जयेश वावदे, ऋषिकेश वराडे यांना संधी दिली. एमआयएम ने मोहम्मद अन्सारी यांना तर राष्ट्रवादी शिवसेना आघाडीने तुषार उर्फ गणेश जाधव यांना संधी दिली. पण, ही निवड पाच वर्षांसाठी आहे की एक वर्षासाठी अशीही चर्चा होत आहे. याबाबत भाजपचेच पदाधिकारी तर्कवितर्क लढवीत आहेत.

**सभापतीपदासाठी मोर्चेबांधणी**

स्थायी समितीत सोळा सदस्यांची निवड करण्यात आली आहे. त्यात सत्ताधारी भारतीय जनता पक्षाचे अकरा सदस्य आहेत. याशिवाय राष्ट्रवादी-शिवसेना शिंदे गटाचे तीन तर एमआयएमच्या दोन सदस्यांचा समावेश आहे. महापालिकेच्या सत्ताकारणात (पान ४ वर)



## शहादा वकील संघ निवडणूक ॲड.खर्डे, ॲड.बिरारे बिनविरोध

**शहादा, दि.३० (प्रतिनिधी) - शहादा वकील संघ निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम मुदत आज दि.२७ रोजी संपली असून दि.३० मार्च रोजी माघार घेण्याची अंतिम मुदत आहे. शहादा वकील संघाचे वातावरण तापले असून प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली आहे.**

शहादा वकील संघ निवडणूक २०२६ साठी अध्यक्ष व उपाध्यक्ष पदांसाठी दि.४ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. अध्यक्षपदासाठी ॲड.दामू संभू पटेल ॲड.स्वर्णसिह आंदनसिह गिरासे, ॲड.आनंदराव मुकुंदराव निकम तर उपाध्यक्ष पदासाठी ॲड.दिनेश मधुकर महिरे, ॲड. जगदीश पितांबर कुवर, ॲड. दानिश हाफीजखान पठाण, ॲड.महेंद्र आत्माराम साळवे यांचे अर्ज दाखल झाले आहेत. सचिव पदासाठी ॲड.कपिल करणसिंग खर्डे एकच उमेदवार असल्याने त्या पदाची बिनविरोध निवड झाल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच महिलांसाठी आरक्षित सहसचिव पदासाठी ॲड.मनिषा राजेंद्र बिरारे एक महिला (पान ४ वर)


**दुकान बंद सूचना**

दि.३१/०३/२०२६ रोजी अकौन्टींग इयर एंडींग (Accounting year ending) साठी दुकान बंद राहिल.

**मे.गंगाधर बाळाशेठ नाशिककर सराफ**

आग्रारोड, धुळे




## पिंपळनेर परिसरात मुसळधार पाऊस अवकाळीचा तडाखा, मोठे नुकसान

**पिंपळनेर, दि.३० (प्रतिनिधी) - काही दिवसांपासून वर्तवण्यात आलेला अवकाळी पावसाचा अंदाज अखेर खरा ठरला असून, सोमवारी दुपारी साक्री तालुक्यातील अनेक भागांना वादळी पावसाने झोडपून काढले. तालुक्यातील नांदवन शेतशिवारात तब्बल एक तास झालेल्या पावसामुळे कांदा पिकाचे नुकसान झाले. बळीराजा पुन्हा एकदा संकटात सापडला आहे.**

सोमवारी दुपारी तीन वाजेच्या सुमारास अचानक वातावरणात बदल झाला, ढगांच्या गडगडाटासह पावसाने जोरदार एन्ट्री केल्याने ग्रामस्थांची व शेतकऱ्यांची मोठी तारांबळ उडाली. नांदवन परिसरात पावसाचा जोर इतका प्रचंड होता की, शेतात काढून ठेवलेला आणि उभा असलेला कांदा पाण्यात भिजला. यामुळे उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त (पान ४ वर)

## पोलीसपाटील नगापुरे बातमीसंदर्भात खुलासा

धुळे, दि.३०- दिवाणमळाचे पोलीस पाटील मिथुन गोविंद नगापुरे यांचे पाण्यात बुडून निधन झाल्याचे वृत्त दि.३० मार्चच्या दै.आपला महाराष्ट्रमध्ये प्रकाशित झाले होते. सदर नाव हे पोलिसांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे दिले होते. मात्र ते चुकीचे असल्याचे त्यांच्या नातेवाईकांनी आमच्या लक्षात आणून दिले असून त्यांना झालेल्या त्रासाबद्दल आम्ही दिलगीर आहोत. धुळे तालुक्यातील दिवाणमळा शिवारातील एमआयडीसीतील इंडोअमायन्स केमिकल कंपनीच्या मागील बाजूस नाल्यातील विहीरीत ज्या व्यक्तीचा मृतदेह सापडला होता, त्या मृतदेहासंदर्भात पोलीस पाटील मिथुन गोविंद नगापुरे यांनी मोहाडी पोलीस स्टेशनला (पान ४ वर)


**दिपक ज्वेलर्स**

सोने- 22 K -1,36,000 रू.+3% GST
सोने- 24 K -1,48,500 रू.+3% GST
चांदी- 2,37,500 रू.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३



आठवा **स्मृतीदिन**

आपल्या पावन स्मृतिस
विनम्र अभिवादन!



**कै. लोकनेते दादासाहेब**
**रामराव सिताराम पाटील (भामरे)**

स्वर्गवास : दि. ३१ मार्च २०१८

आपल्या संस्कारांचा अन् सद्गुणांचा सुगंध आजही जीवनात दरवळतो...
आपल्या स्मृतींचा ठेवा निरंतर आमच्या हृदयी वसतो.
आदरणीय दादा आपणांस स्मृती दिनानिमित्त शत् शत् प्रणाम..!

आपले श्रद्धान्वत

| | |
|---|---|
| श्री. सुरेश रामराव पाटील | सौ. मंगलाताई सुरेश पाटील |
| मा.खा.डॉ.सुभाष रामराव भामरे | सौ. डॉ.बिना सुभाष भामरे |
| श्री. विक्रम नानाजी शिंदे | सौ. सुनंदा विक्रम शिंदे |
| श्री. अशोक झिपरू देवरे | सौ. अलका अशोक देवरे |
| श्री. सुधिर यमाजी पवार | सौ. सिमा सुधिर पवार |
| श्री. प्रविण रावसाहेब भामरे | सौ. प्रतिभा प्रविण भामरे |
| श्री. दिलीप रावसाहेब भामरे | सौ. अर्चना दिलीप भामरे |
| श्री. डॉ.राहूल सुभाष भामरे | सौ. डॉ.आराधना राहुल भामरे |
| श्री. चंद्रजित सुरेश पाटील | सौ. दिपाली चंद्रजित पाटील |
| श्री. रोहन सुभाष भामरे | सौ. अनुजा रोहन भामरे |
| चि. अभिर राहुल भामरे | कु. अनाही राहुल भामरे |

कु. शरयु रोहन भामरे



**मा.खा. डॉ.सुभाष भामरे**
(मा. केंद्रीय संरक्षण राज्य मंत्री, भारत सरकार)

सर्व पदाधिकारी व सदस्य, कै. गोजरताई भामरे सांस्कृतिक व शैक्षणिक मंडळ, धुळे.



**श्री अचलगच्छाधिपती श्रीमद् जिनेंद्रसागर सुरीश्वरजी**
**श्री कच्छी दसा ओसवाल जैन विद्यार्थी गृह (बोर्डिंग) धुलिया.**



**24 वे तीर्थंकर शासनपति**
भगवान श्री महावीर जन्म कल्याणक की हार्दिक शुभकामनाएँ।
भगवान श्री महावीर का संदेश:
**"अहिंसा परमो धर्मः जियो और जीने दो।"**

Shri. Achalgachadhipati Shrimad Jinendrasagar Surishwarji
Shri. Cutchi Dasa Oswal Jain Vidhyarthi Gruha's
**SHREEJI ENGLISH MEDIUM SCHOOL**
SHAPING FUTURE LEADERS THROUGH QUALITY EDUCATION
80 Feet Road, Opp. Lokmanya Hospital, Dhule

**ADMISSION OPEN**
**2026–27**
Play Group to Std. X
Admission Form Available

25% Concession for Jain Students

25% Concession for Jain Students

Office Timing: 9:00 am to 1:00 pm

FEATURES
- 25% Concession in School Fees for Jain Community Students.
- Emphasis on Quality Education and Student-Centric Learning.
- Highly Qualified Staff.
- Advanced Facilities including Tata Edge Software, Computer Lab, Science Lab, Library, CCTV Camera.
- Spacious Playground with Various Sports Facilities.
- Diverse Activities Throughout the Year to Foster Holistic Student Development.

**पधारो**
श्री मुनीसुव्रत स्वामी नुतन गृह जिनालय
श्री मुनीसुव्रत स्वामी __आदी जिन बिंबो सह गुरुमुर्ती एवमं शासन देवी प्रतिष्ठा
प्रसंगे २९ एप्रिल २०२६ वैशाख सुद १३

# आपला महाराष्ट्र

## महावीर आणि बुध्द समकालीन तत्त्वज्ञ

आज महावीर जयंती आहे. दरवर्षी देशभर या दिवशी जैन बांधव मोठ्या प्रमाणावर एकत्र येत व्रत वैकल्ये पार पाडतात. महावीरांनी अहिंसा या तत्वाला सर्वोच्च स्थान दिले होते. अहिंसा परमो धर्म अशी ज्यांची शिकवण होती आणि ती अतिशय काटेकोरपणे अमलात आणली होती. कुठल्याही जीवाला इजा होऊ नये. चालताना आपल्या पायाखाली जंतू मरू नयेत, श्वासावाटे शरीरात जंतूंचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून जैन साधू आणि साध्वी आपल्या तोंडाला पांढरी पट्टी बांधतात. त्यांच्या हातात झाडू असतो. अगदी छोट्यातल्या छोट्या जीवाची हानी होऊ नये हा त्यामागे उद्देश आहे. म्हणून अहिंसा हे केवळ व्यक्तिगत आणि सार्वजनिक जीवनातील नैतिक मूल्य न राहता कठोरपणे आचरणात आणण्याचा मुद्दा बनते. आणखीही अहिंसेच्या संदर्भात अनेक बाबी आहेत. महिलांना अध्यात्मिक क्षेत्रात उपासनेचा अधिकार मिळावा म्हणून महावीरांनी सर्वप्रथम महिलांना दीक्षा देण्याचे तत्व मान्य केले. त्यामुळे आजही जैन संघात साध्वींची मोठी परंपरा दिसते. तारुण्यातच सर्व संगपरित्याग करून शुभ्र वस्त्रे परिधान करणे आणि अहिंसेच्या तत्त्वाचा प्रचार प्रसार करणे यातच त्यांचे आयुष्य खर्ची पडते. एकदा त्याग केल्यानंतर जैन साध्वी पुन्हा कधीही कुठल्याही मोहाला बळी पडत नाहीत. इतर कोणत्याही धर्म किंवा पंथात इतके कडक नियम सापडत नाहीत तेवढे जैन धर्मात सापडतात. मुळात ज्या काळात महावीरांनी महिलांना दीक्षा घेण्याचा मार्ग खुला करून दिला तो काळ अतिशय सनातनी होता. अशा परिस्थितीत महिलांना अध्यात्माचा मार्ग खुला करून देणे ही मोठी क्रांती होती. त्याच काळात गौतम बुद्धाचा उदय झालेला आहे. हे दोन्ही महापुरुष समकालीन होते. त्यांनीही अहिंसेला महत्व दिले. बुद्धाची अहिंसा ही करुणा आणि विवेकवादाशी जोडलेली दिसते. त्यांनी जीवन अनित्य असल्याचे सांगितले होते. उत्पत्ती स्थिती आणि लय ही जगाची नैसर्गिक प्रक्रिया असून कोणतीच वस्तू किंवा गोष्ट शाश्वत नाही. म्हणूनच बुद्धाचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन वैज्ञानिक आणि अनुभवावर आधारित असल्याचे स्पष्ट होते. त्यांची ज्ञान साधना आणि जीवनशैली कठोर नियमांच्या अधीन नव्हती तर प्रत्येकाच्या विवेकातून पालन करण्याची बाब होती. जैन परंपरेत किंवा विचारसरणीत मांसाहाराला अजिबात स्थान नाही. शाकाहार तोही सपक असा आहार त्यात अनिवार्य दिसतो. भगवान गौतम बुद्धांनी मात्र भिख्खूंना भिक्षेत मिळालेले अन्न स्वीकारण्याची परवानगी दिली. जे खाद्य त्यांना दिले जात होते त्यासाठी जाणीवपूर्वक हिंसा केलेली नाही असे गृहीत धरून त्यांचा अहिंसेकडे बघण्याचा दृष्टिकोन बनला होता.

महावीरांनी दीर्घकाळ तपश्चर्य केली आणि त्यातून त्यागाची संकल्पना विकसित केली. ती एवढी की अंगावर वस्त्र देखील वापरावयाचे नाही म्हणजेच तेवढीही आसक्ती नको अशी भूमिका महावीरांची होती. मात्र बुद्धांनी सर्व राजपाट, वैभव आणि आपला परिवार यांचा त्याग करून मधल्या मार्गाचा सिद्धांत मांडला. अति भोग आणि अति तपश्चर्या या दोन्ही मुद्द्यांना टाळून एक संतुलित मार्ग त्यांनी आपल्या अनुयायांसाठी निर्माण केला. जेव्हा त्यांना वृक्षाखाली ज्ञानाची प्राप्ती झाली. त्यानंतर त्यांच्या पत्नी यशोधरा यांच्या हातून त्यांनी भिक्षा स्वीकारली याचाच अर्थ ते आंतर बाह्य विरक्त झाले होते. बौद्ध आणि जैन या दोन्ही धर्मातील तत्त्वांना जवळपास अडीच हजार वर्षाहून अधिक काळ लोटला. त्यानुसार जैन धर्मात काही कर्मकांडांचा अंतर्भाव झाला. मात्र त्याचवेळी संयम आणि त्याग या दोन सिद्धांतांना या धर्मात विशेष स्थान दिले गेले. तो आदर्श त्यांनी कायम ठेवला. रोजच्या व्यवहारात समाजात त्यासंबंधी काही गुंतागुंत देखील वाढली. बुद्धांनी मात्र विचार आणि अनुभव तसेच तर्क यांच्या आधारे मार्ग दाखवला. त्यामुळे त्यांचे तत्त्वज्ञान सर्वसामान्य माणसांना अधिक भावले आणि ते व्यापक स्वरूपाचे आहे. भगवान महावीर आणि गौतम बुद्ध या दोघांचेही ध्येय समान होते. जगात जेवढे महापुरुष झाले त्यांनी सर्वांनी शस्त्र हातात घेणार नाही अशी ग्वाही दिली होती. श्रीराम, परशुराम, श्रीकृष्ण यांचा प्रमुख्याने त्यात समावेश करावा लागेल. असा प्रण केलेला असला तरी श्रीरामाला धनुष्यबाण हातात घ्यावा लागला. श्रीकृष्णाला सुदर्शन धारण करावे लागले. शिवाय अनेकांना गनिमी काव्याचा वापर करून त्यांनी ठार करायला सांगितले. परशुरामाने शस्त्र हाती न घेण्याची ग्वाही दिलेली असताना २१ वेळा पृथ्वीचे निर्दालन केले. त्यानंतर अडीच हजार वर्षांनी महावीर आणि बुद्ध अवतरले. त्यांनी अहिंसेचे तत्वज्ञान अंगीकारले आणि त्याचा प्रसार केला. त्याची एक चौकट तयार केली. मात्र कुठलेही शस्त्र त्यांनी हाती घेतलेले नाही. त्यानंतरच्या अडीच हजार वर्षांनी महात्मा गांधी असे एक महापुरुष भारतात अवतरले की त्यांनी अहिंसेचा वापर स्वातंत्र्यासाठी विनाशस्त्र केला. अशा तऱ्हेने महावीर आणि गौतम बुद्ध हे दोघेही भारतीय चिंतनाच्या तत्त्वज्ञानात खूप मोठे मार्गदर्शक आहेत. महावीरांनी आयुष्याला कठोर तपश्चर्याची जोड दिली तर बुद्धांनी विवेकाने करुणा यांची दिशा दिली. या दोघांच्या विचार प्रवाहातून भारताने जगाला मोठा संदेश दिलेला आहे.

सगळीकडे सत्ता संपत्ती आणि कर्मकांड यासाठी युद्ध होत असताना करुणा आणि संयम तसेच विवेक भारताने जगाला दिला. त्याचे सर्व श्रेय भगवान महावीर आणि बुद्धांना जाते. गांधीजी आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी या दोन्ही महापुरुषांच्या तत्त्वांचा आदर्श समोर ठेवून देशासाठी काम केले.गांधीजींनी या महापुरुषांचा विचार स्वातंत्र्य लढ्यात अमलात आणला तर बाबासाहेबांनी महावीर–बुद्धांचे तत्व संविधानात आणले.आज जी परिस्थिती आपल्या सभोवताली आहे त्यात हिंसा आहे, भयंकर द्वेष आहे, धर्माधर्मात विभाजन आहे, जाती जातीत विषमता आहे, सगळीकडे असहिष्णुतेचा बोलबाला असून असहिष्णुतेला बळ देण्याचे काम विद्यमान राजकीय व्यवस्था करीत आहे. परंतु अहिंसा आणि संयमाचा अंगीकार करून त्याचा प्रसार प्रचार करणाऱ्यांना ते कळत नाही हे दुर्दैव म्हणावे लागेल. ते या व्यवस्थेत वाहून गेले आहेत. अशा काळातच महावीरांची अहिंसा आणि बुद्धांची करुणा या मुद्द्यांचे स्मरण करण्याची गरज आहे. या सर्व पार्श्वभूमीवर महावीर जयंती साजरी करताना त्यानिमित्ताने जैन आणि बुद्ध या दोन महान परंपरांकडे समान दृष्टिकोनातून बघणे महत्त्वाचे आहे. अहिंसा केवळ उपदेश नाही. गांधीजींनी ज्याप्रमाणे अहिंसेचा वापर स्वतः च्या आयुष्यात व्यक्तिगत जगण्याच्या संदर्भात केला आणि सत्यासाठी त्याचा केला. शेवटी तो अखिल मानवाच्या उन्नतीचा आधार ठरला आहे. आज इराण इजराइल अमेरिका, रशिया युक्रेन मध्ये हिंसेचा आग डोंब उठला आहे. तेव्हा आम्ही आम्हाला युद्ध नको बुद्ध आणि महावीर हवे असे म्हणतो त्याचे महत्त्व आहे. कारण तोच माणसाच्या उन्नतीचा मुख्य आधार आहे. . ते एकदा ध्यानस्थ बसलेले असताना त्यांच्या धैर्याची परीक्षा घेण्याचे संगम नावाच्या देवाने ठरविले. त्यांच्या तपश्चर्येचा भंग व्हावा म्हणून एक रात्रभर अनेक प्रकारचे कष्ट त्यांना देण्यात आले. सर्व प्रकारचे हिस्त्र प्राणी त्यांच्यावर सोडले. त्यांना ते चावले. असे सर्व असताना भगवान महावीर थोडेही आपल्या तपश्चर्येपासून ढळले नाहीत. शेवटी त्या देवाला पश्चाताप झाला. तो माफी मागू लागला. तेव्हा महावीरांच्या डोळ्यात पाणी आले. तेव्हा तो म्हणाला तुम्ही वेदनेमुळे रडत आहात का तेव्हा महावीर त्याला म्हणाले मी तुझ्यासाठी रडतोय. कारण माझ्या परीक्षेसाठी तू अनेक पापे केलेली आहेस त्याचे फळ तुला भोगावे लागेल याचे मला वाईट वाटते. म्हणून मी रडतोय. थोडक्यात हा प्रसंग समभाव आणि दया दर्शवतो. आपला मित्र असो की आपला शत्रू असो त्याच्या दुःख आणि सुखाकडे सारख्याच नजरेने बघावे. हेच खरे महावीरांचे तत्वज्ञान आहे. जगा आणि जगू द्या, जिओ जीवस्य जीवनम हे तत्त्वज्ञान म्हणूनच आजही धकाधकीच्या काळात लागू पडते. महावीरांच्या एकूण तत्वज्ञानाचे सार हे एका धर्माच्या कोंदणात बसणारे नाही. त्यांनी जरी जैन धर्माच्या श्रमण आणि श्रमणींना या तत्त्वानुसार जगण्याचा संदेश दिला असला तरी अखिल मानव जातीसाठी तो उपयुक्त आहे.

## धुळे बाजार समितीत गव्हासह हरभरा, तुरीचा आवक वाढली

**धुळे, दि.३० (प्रतिनिधी) : धुळे कृषी उत्पन्न बाजार समितीत सध्या गव्हाची मोठ्या प्रमाणात आवक होत आहे. बाजार समितीत मंगळवारी आठवडे बाजार असतो. त्यादिवशी धुळे तालुक्यासह अन्य भागातील गहू विक्रीस येतो. सध्या लिलाव सुरू होताच गव्हाचे दर एक हजार ९०० ते दोन हजार दोनशे रूपये प्रतिक्किंटल ठरतात. गव्हाबरोबरच तूर आणि हरभऱ्याची देखील आवक होत आहे. त्यामुळे बाजार समितीत मोठी उलाढाल होत आहे.**

धुळे तालुक्यात गेल्या काही वर्षांत सिंचन प्रकल्पांची कामे झाली आहेत. तसेच पाणी अडवा, पाणी जिरवा कार्यक्रम राबवितांना काही सेवाभावी संस्थांनी नाला खोलीकरण आणि रूंदीकरणाची कामे देखील केली आहेत. त्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी उंचावली आहे. सहाजिकच सिंचन क्षेत्रात वाढ झाली आहे. अनेक शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात गहू, हरभरा, तूर या सारखी पिके घेतली आहेत. सध्या सर्वत्र रब्बी पिकांची काढणी सुरू आहे. शेतकऱ्यांकडून सध्या गहू, हरभरा, मका, तूर ही पिके विक्रीसाठी बाजार समितीत आणली जात आहेत. सध्या बाजार समितीत शेतीमालास मिळणारा दर हा अपेक्षेप्रमाणे नाही, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे, शेतकऱ्यांना गव्हासाठी तीन हजार रूपये प्रति क्किंटल दर हवा आहे. पण, त्याचवेळी बाजारात विक्रीस येणाऱ्या गव्हात वाढ होत आहे. आवक जास्त झाल्याने दर कमी होण्याची श्नयता आहे, असे काही व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. पण, बहुतांशी व्यापाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, गव्हाचे दर सरासरी दोन हजार शंभर रुपयांच्या आसपास राहतील. सध्या बहुसंख्य मध्यमवर्गीय कुटुंबातील महिला-पुरूष वर्षभर पुरेल, या बेताने गव्हाची खरेदी करीत आहेत.



## सिद्धांत महाविद्यालयातर्फे उन्नत भारत अभियान

**साक्री, दि.३० (प्रतिनिधी)- संत तुकाराम सामाजिक संस्थेच्या सिद्धांत वरिष्ठ महाविद्यालय, पंढरपूर शिवार अंबापुर, ता.साक्री यांच्या वतीने उन्नत भारत अभियान अंतर्गत राबविण्यात आलेल्या सर्वेक्षण मोहिमेचे काम यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले.**

तेवीस ते अठ्ठाविस मार्च २०२६ या कालावधीत शेवाळी, कळंभीर, धमनार, महिर, कावठे व अष्टाणे या गावांमध्ये सर्वेक्षणाचे काम करण्यात आले. सदरील गावामध्ये जाऊन महाविद्यालयाच्या विद्यार्थी व प्राध्यापक यांनी प्रत्येक गावातील ५० कुटुंबांचे वैयक्तिक सर्वेक्षण व गावातील विविध विकास कामांचा आढावा घेऊन सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक तसेच मूलभूत सुविधांबाबत माहिती संकलित केली. सर्वेक्षणादरम्यान संबंधित गावांचे सरपंच, उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी तसेच ग्रामस्थ यांनी उत्स्फूर्त व व्यवस्थित सहकार्य केले. या उपक्रमामुळे गावांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक माहिती उपलब्ध होऊन भविष्यात विविध विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यास मदत होणार असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजीव पगारे यांनी सांगितले कार्यक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करण्याकरिता सहा. प्रा.भूषण शेमले, प्रा. श्रीमती पल्लवी वाघ, प्रा.अजय गांगुर्डे यांनी विशेष परिश्रम घेतले.



## बिल्डर्स असोसिएशन अध्यक्षपदी अक्षय मुंडके

धुळे, दि.३०- बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया या संघटनेच्या धुळे शाखेच्या २०२५-२६ या वर्षासाठी चेअरमनपदी इंजि अक्षय प्रमोद मुंडके तर सचिव पदावर इंजि आनंद बाळापूरकर यांची निवड करण्यात आली आहे. बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया धुळे शाखेच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत सर्वानुमते पदाधिकारी निवड जाहीर करण्यात आली. नूतन कार्यकारिणीमध्ये दीपक शेलार उपाध्यक्ष, सहसचिव संदीप सैंदाणे, खजिनदार शेषराज जाधव यांची निवड झाली तर सुनील मुंदडा व भारत वाघ यांची जनरल कौन्सिल सदस्य पदावर निवड जाहीर करण्यात आली. नवीन पदाधिकाऱ्यांचा एक एप्रिलपासून कार्यकाळ सुरू होत आहे व त्यांनी कामकाजाला सुरुवात देखील केली आहे.सोबतच स्फूर्ति विंग अणि यूथ विंग ची देखील स्थापना करण्यात आली आहे. नूतन पदाधिकाऱ्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

## पन्नास वर्षानंतर कॉन्व्हेंटचे माजी विद्यार्थी एकत्र आले; जुन्या आठवणींचा केला जागर

**धुळे, दि.३१- १९७५ साली कनोसा कॉन्व्हेंट हायस्कूल येथून दहावीच्या परीक्षा देऊन बाहेर पडलेल्या माजी विद्यार्थ्यांनी तब्बल पन्नास वर्षानंतर एकत्र येत शाळेला भेट देऊन जुन्या आठवणींना उजाळा दिला. विषेश म्हणजे आपल्या गुरुस्थानी असणाऱ्या माजी शिक्षकांचा घरी जाऊन आशीर्वाद घेतला.धुळ्यातील प्रसिद्ध कनोसा कॉन्व्हेंटच्या १९७५ मधील माजी विद्यार्थ्यांनी तब्बल पन्नास वर्षानंतर एकत्र येत सुवर्ण महोत्सवी सोहळा साजरा केला.**

या विद्यार्थ्यांमधील अनेक जण डॉक्टर, प्रख्यात वकील, बँकांमधील बडे अधिकारी, मोठ-मोठे व्यवसायिक झाले आहेत. साक्री रोडवरील सुवर्ण स्पर्श रिसॉर्ट येथे २७ व २८ मार्चला सर्वांनी एकत्र जुन्या आठवणींना उजाळा दिला.शालेय जीवनातील आनंदाचे क्षण व गप्पा यामुळे पन्नास वर्षा नंतर जुन्या आठवणी ताज्या झाल्या. गप्पा व आयुष्यातील सुख दुःखाचे क्षण, मुलांचे व नातवंडांच्या माहितीचे आदान प्रदान झाले. जुन्या मराठी व हिंदी गाण्यांची सामूहिक गायन झाले. शालेय जीवनातील आनंदाच्या आठवणी मुळे दोन दिवसाचा कालावधी सर्वांना अपूर्ण वाटला. यावेळी दिवंगत सहमित्रांच्या आठवणी व त्यांच्या सोबतचे मैत्रीपूर्ण संबंध यांना उजाळा मिळाला.




कनोसा कॉन्व्हेंटच्या १९७५ च्या बॅचमधील माजी विद्यार्थ्यांनी आठवणीतील धुळे म्हणून आई एकविरा देवी मंदिराला भेट दिली. याचप्रमाणे नव्याने उभारलेल्या स्वामीनारायण मंदिरात देखील भेट दिली.आपल्या व्यस्त कार्यक्रमात शाळेची भेट यासाठी खास वेळ रविवारी शाळा प्रशासनाकडून घेण्यात आला होता. रविवारी शाळेत नव्या जोमाने माजी विद्यार्थ्यांनी आपले वर्ग, मैदान, प्रार्थनेची जागा, डबा खाण्याची जागा, पहिली ते दहावी पर्यंतचे वर्ग यांना भेटी देताना सगळे भारावून गेले होते. शाळेतील बदललेल्या प्रशासनातील सर्वांना जुन्या शिक्षकांच्या व मुख्याध्यापीका (मदर्सची) माहिती सांगताना कोणी थकत नव्हते. दोन माजी शिक्षकांच्या घरी जाऊन त्यांचा सत्कार सर्वांनी मनोभावे केला. रंगलेल्या गप्पांमधून त्यांच्याशी देखील जुन्या आठवणींचे आदान प्रदान केले व आशीर्वाद घेतला. कार्यक्रमाचा समारोप सुनील चौधरी यांनी आपल्या घरी मोठ्या आधारा तिथ्याने खास खानदेशी पंगत देऊन केला.

यावेळी १९७५ च्या कनोसा कॉन्व्हेंट बॅचचे ॲड. हर्षद निंबाळकर,नरेश ईश्वरभाई शहा, मोहन पाडवी, सुनील चौधरी, सुनिल भारतीय, डॉ. नीलिमा मदाने ईनामदार, राजेश भाटे, अली अजगर, मिलिंद पाटील, जगदीश सिंग, दिलीप वाघ, भूपेंद्र सिंग,निशीराज जाधव, श्रीरंग शिंदे, सौ.रेखा भोईटे, सौ. अल्पना पवार, सौ.सुजाता देसाई, शैलेंद्र कुलकर्णी, शायनी मॅथ्यूस बाबू यांच्या उपस्थितीमुळे सुवर्ण महोत्सवी कार्यक्रम सोहळा अत्यंत आनंदात संपन्न झाला.

## शास्ती माफीचा लाभ घ्या; मनपा प्रशासनाचे आवाहन

**धुळे, दि.३०- महानगरपालिकेने थकीत घरपट्टी आणि पाणीपट्टी भरण्यासाठी नागरिकांना शास्ती माफीची सवलत दिली आहे. मात्र, प्रशासनाने संधी देऊनही या योजनेला अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचे चित्र आहे. यामुळे आता महापालिका प्रशासन आक्रमक झाले आहे. थकबाकीदारांनी ३१ मार्च पर्यंत थकबाकी देऊन दंडात सुट मिळवावी. नाही तर मालमत्ता जप्तीची कारवाई होईल, असा इशारा देण्यात आला आहे.**

धुळे महापालिकेचे कार्यक्षेत्र वाढले. त्यामुळे मालमत्ताकाराच्या माध्यमातून निधी येईल, अशी अपेक्षा होती. पण, प्रतिकुल परिस्थितीमुळे अनेक जण मालमत्ताकराचा भरणा करू शकले नाहीत. परिणामी, मालमत्ता कराची थकबाकी झाली आहे. महापालिकेच्या तिजोरी पैसे यावेत म्हणून महापालिकेने दंड आकारणीत सुट देण्याची भूमिका घेतली. मार्च अखेर थकबाकी भरा आणि सुट मिळवा, असे आवाहन करण्यात आले. पण, त्याला अनेपक्षित प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे मुदत संपत असताना महापालिका प्रशासन आक्रमक झाले आहे. महापालिकेचे वसुली निरीक्षक शिरीष जाधव यांनी नागरिकांना आवाहन केले आहे. नागरिकांनी संधीचा लाभ घेऊन आपला थकीत मालमत्ता कर आणि पाणीपट्टी त्वरित भरावी आणि प्रशासनाला सहकार्य करावे. दिलेल्या मुदतीत कर भरला नाही, तर आयुक्त आणि महापौरांच्या आदेशानुसार थेट मालमत्ता जप्तीसारखी कटू आणि कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही जाधव यांनी दिला आहे. जप्तीची नामुष्की टाळण्यासाठी धुळेकरांनी ३१ मार्चपूर्वी आपला कर भरणे गरजेचे झाले आहे.

## गोंदवलेकर महाराज मंदिरात गीत रघुनंदन कार्यक्रमाने रामभक्त मंत्रमुग्ध

**धुळे, दि.३०- देवपूर नकाणे रोड परिसरातील गोकर्ण कॉलनीतील परमपूज्य ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज मंदिरात श्रीराम नवमीचे औचित्य साधून 'गीत रघुनंदन' या विशेष भक्ती संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मार्च या सुश्राव्य कार्यक्रमाने उपस्थित रसिकांना रामभक्तीच्या रसात चिंब भिजवले.**

धुळ्याचे ज्येष्ठ कवी आणि गीतकार प्र.अ. पुराणिक रचित 'गीत रघुनंदन' या कार्यक्रमाचे सादरीकरण 'स्वर रजनी ग्रुप, धुळेच्या कलावंतांनी केले. यात प्रख्यात गायिका प्रा.वीणा कमलाकर यांनी आपल्या सुमधुर आवाजात राम गीते सादर केली. निवेदिता पपीता जोशी यांनी आपल्या सुमधुर आवाजात सूत्रसंचालन केले. त्यांना तबल्यावर मयूर वराडे यांनी उत्तम साथसंगत केली. संध्याकाळी पाच ते साडेसहा या कालावधीत झालेल्या या कार्यक्रमामुळे संपूर्ण मंदिर परिसर भक्तीमय झाला होता. या भक्तीपूर्ण सोहळ्याला धुळ्यातील प्रतिष्ठित रसिक वर्ग आणि श्री गोंदवलेकर महाराज परिवारातील भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. कलावंतांच्या सादरीकरणाने उपस्थित सर्वच श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंदिराचे मुख्य विश्वस्त किरण देशपांडे व व त्यांच्या पत्नी आणि त्यांच्या दोन्ही कन्यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच संयोजक राजेंद्र मुळे आणि अनिल बुवा यांच्यासह सर्व भक्तांनी मनस्वी सहकार्य केले. कार्यक्रमाच्या सांगतेवेळी उपस्थित भाविकांनी या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले.



## नंदुरबार शहरातील तीन प्रमुख चौक उजळले आ.रघुवंशी यांच्या हस्ते हायमस्टचे लोकार्पण

**नंदुरबार, दि.३० (प्रतिनिधी)- शहरातील महाराणा प्रताप पुतळा, खोडाई माता मंदिर परिसर आणि जगताप वाडी चौक आता हायमस्ट लाईटच्या प्रकाशाने झगमगून गेले आहेत. महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या ३ हायमस्ट लाईट्सचे लोकार्पण शिवसेनेचे संपर्कप्रमुख आमदार चंद्रकांत रघुवंशी यांच्या हस्ते करण्यात आले.**

हायमस्ट लाईटच्या प्रकाशाने शहराच्या सौंदर्यात भर पडली असून, नागरिकांकडून समाधान व्यक्त होत आहे. नगरपालिकेमार्फत शहरात साडेबारा मीटर उंचीचे आणि २०० वॅट क्षमतेचे ३ हायमस्ट लाईट बसविण्यात आले आहेत. या कामाचे उद्घाटन आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी स्विच दाबून केले.शहरातील महाराणा प्रताप पुतळा, खोडाई माता मंदिर परिसर आणि जगताप वाडी चौक प्रकाश व्यवस्थेमुळे झगमगून गेली असून, सुरक्षेच्या दृष्टीनेही महत्त्वाची भर पडली आहे. याप्रसंगी उपनगराध्यक्ष प्रथमेश चौधरी, माजी नगराध्यक्ष कुणाल वसावे, पाणीपुरवठा सभापती कैलास पाटील, आरोग्य सभापती देवेंद्र जैन, आरोग्य सभापती प्रीतम ढंडोरे, बाजार समिती सभापती दीपक मराठे, नगरसेवक रविंद्र पवार, अमित परदेशी, गौरव चौधरी, मोहितसिंग राजपूत, भरत चौधरी, कमल ठाकूर, अतुल पाटील, आकाश अहिरे यांसह मान्यवर उपस्थित होते.

## लुपिन फाउंडेशनच्या गतिमान कार्यपद्धतीचे सरपंचांकडून विशेष कौतुक

**साक्री, दि.३०- तालुक्यातील आखाडे ग्रामपंचायत हद्दीत लुपिन फाउंडेशनच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या जलसंधारण कामांची सरपंच तथा प्रशासक सौ.सारिका शिवलाल ठाकरे यांनी प्रत्यक्ष स्थळावर जाऊन पाहणी केली. ग्रामस्थांच्या लोकसहभागातून आणि संस्थेच्या पुढाकारातून पूर्ण झालेल्या या कामामुळे शेतीसाठी पाणीसाठा वाढण्यास मोठी मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.**

यावेळी सरपंच सौ.सारिका ठाकरे यांनी कामाच्या गुणवत्तेचा आढावा घेत संबंधितांशी चर्चा केली. जलसंधारणाच्या दृष्टीने हे काम गावासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. शासकीय कामांमध्ये अनेकदा कागदपत्रांची प्रक्रिया आणि प्रशासकीय अडथळयांमुळे विकासकामांना विलंब होतो. मात्र केवळ ग्रामसभा ठरावाच्या आधारे लुपिन फाउंडेशनने तत्परतेने पुढाकार घेत हे काम मार्गी लावले. संस्थेची ही गतिमान कार्यपद्धती निश्चितच कौतुकास्पद आहे, असे त्या म्हणाल्या. त्यांनी पुढे सांगितले की, लुपिन फाउंडेशनने प्रशासकीय अडथळे दूर सारत लोकसहभागातून जलसंधारणाला चालना दिली आहे. या कामामुळे पावसाचे पाणी साठवण क्षमता वाढणार असून भूजल पातळी सुधारण्यास मदत होईल.




परिणामी शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी उपलब्ध होऊन उत्पादनात वाढ होण्यास मदत होणार आहे. सरपंच सौ.सारिका ठाकरे यांनी ग्रामस्थांच्या सहभागाचेही कौतुक करत सांगितले की, गावाच्या विकासासाठी लोकसहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. लुपिन फाउंडेशनचे मार्गदर्शन आणि ग्रामस्थांचा सहभाग यामुळे हे काम कमी कालावधीत पूर्ण होऊ शकले. भविष्यातही अशाच प्रकारच्या विकासकामांसाठी ग्रामपंचायत स्तरावरून प्रयत्न सुरू राहतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या पाहणीदरम्यान ग्रामस्थ, शेतकरी तसेच स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते. लुपिन फाउंडेशन आणि ग्रामपंचायत यांच्या समन्वयातून राबविण्यात आलेला हा जलसंधारण प्रकल्प ग्रामीण विकासासाठी आदर्श ठरत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## राऊळ नगरात घरफोडी

धुळे- शिंदखेडा तालुक्यातील दोंडाईचा येथील राऊळ नगरातील घराचा कडी कोंडा तोडून अज्ञात व्यक्तीने घरातील सोने, चांदीचे दागिने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली.चोरट्यांनी घरातील सोने, चांदीचे दागिने असा एकुण पंचवीस हजार तीनशे रूपये किंमतीचा मुद्देमाल दि.१५ फेब्रुवारी रोजी रात्रीच्या सुमारास चोरून नेला.

प्रकाश में आज शहजादा




राजेशखन्ना, राखी, मदनपुरी, वीणा, जयराज, मोहन चोटी

MANOHAR CHITRA MANDIR, DHULE 3 Show DAILY




Address:- Oppo. Shriram Pump, Old Agra Road, Dhule

Dhurandhar THE REVENGE (A) 11:45 AM, 4 & 8:30 PM

| Ticket | बाल्कनी | प्लेटिनियम | गोल्ड | सिल्वर |
|---|---|---|---|---|
| Ticket Rate | ₹180 | ₹130 | ₹100 | ₹100 |

www.facebook.com/ManoharBigCinemasIndia 9765499993 02562-232021 Book my Show district BY ZOMATO

BOOKING OPENS ज्योती सिनेमा 3D JYOTI DOLBY DIGITAL PLUS




ता. ३० से रोज ३ खेल टा. ११:४५,४,८:४५ बजे धुरंधर-२

| तिकीट दर | गोल्ड | सिल्वर | बाल्कनी |
|---|---|---|---|
| | ८०रु | ८०रु | १३०रु |

book my show 9422789999/9823177599 Jyoticinemadhule.

## पान १ वरुन

### शालार्थ आयडी घोटाळ्यात..

येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यासोबतच अशोक खरातशी संबंधित काही व्यक्तीही पोलिसांच्या रडारवर असल्याची माहिती मिळत आहे.

**राजकीय संबंधांवर चर्चा**

अशोक खरात आणि दीपक केसरकर यांच्यातील संबंधांमुळेच दिलीप खरातला शालार्थ आयडी मिळाल्याची चर्चा शिक्षण विभागात आहे. त्यावेळी काही शिक्षकांनी आंदोलन देखील केले होते. त्यानंतर त्या शिक्षकांना शालार्थ आयडी दिला गेला, अशीही चर्चा आहे. मात्र अधिकृतरित्या याबाबत कोणतेही स्पष्ट वक्तव्य करण्यात आलेले नाही.

**रुपाली चाकणकरांना पोचली झळ**

या प्रकरणात रुपाली चाकणकर यांचे नावही समोर आले होतं. त्यामुळे त्यांना आधी महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा आणि नंतर पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला. तसेच शिवनिका संस्थानच्या विश्वस्तांसह त्यांनाही एसआयटीकडून समन्स बजावण्यात आले असून चौकशी होणार आहे. दरम्यान, रुपाली चाकणकर यांचे पती निलेश चाकणकर यांच्यावरही आरोप करण्यात आले आहेत. रायगड जिल्ह्यातील रोहा येथे अनधिकृत बांधकाम केल्याचा आरोप करण्यात आला असून या संदर्भात निलेश चाकणकरांच्या विरोधात न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे.

### शहादा वकील संघ निवडणूक

उमेदवार पुढे आल्याने ते पद देखील बिनविरोध झाले आहे. छाननी प्रक्रिया दि.३० रोजी होणार आहे. अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदासाठी थेट लढत होणार असून वकील संघात निवडणूकीची चांगलीच चुरस निर्माण झाली आहे. वकील मतदारांशी संपर्क साधण्यासाठी बैठका, वैयक्तिक भेटीगाठी, तसेच लहान गटांमध्ये संवाद साधण्यावर भर दिला जात आहे. मतदारांना योग्य पद्धतीने मतदान करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.शहादा वकील संघाच्या निवडणूकीमुळे वकील वर्गात प्रचाराला वेग आला असून दोन तीन दिवसांत प्रचार अधिकच रंगणार असल्याचे चित्र आहे.

### संविधान संरक्षण समितीची निदर्शने

जिल्ह्यातील कथावाचक राजीव झा यांनी अमळनेर येथील कार्यक्रमात भारतीय संविधानाबाबत अवमानकारक वक्तव्य केल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून आजीवन बंदी घालण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. धर्माच्या नावाखाली अंधश्रद्धा पसरवून जनतेची आर्थिक, शारीरिक आणि मानसिक फसवणूक करणाऱ्या भोंदू बाबांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत, असे म्हणत निवेदनात काही प्रवचनकारांची नावे देण्यात आली आहेत. मध्यप्रदेशातील स्वरूपानंद यांनी अशोक खरात यांच्याबाबत केलेल्या कथित जातीय वक्तव्याचा उल्लेख करत संबंधितांवर अनुसुचित जाती-जमाची अत्याचार प्रतिबंध कायद्यानुसार फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. कथित प्रवचनांमुळे समाजात तणाव निर्माण होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. राज्यात अंधश्रद्धा निर्मूलन कायदा असला तरी तो प्रभावीपणे अंमलात येत नाही. भोंदू बाबांच्या विरोधात कठो कायदा करण्यात यावा, अशी मागणी देखील निवेदनात करण्यात आली आहे. अंधश्रद्धा पसरवून नागरिकांची दिशाभूल करणाऱ्या प्रवचनांवर कायमस्वरूपी बंदी घालण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदन देताना संविधान संरक्षण समितीचे अध्यक्ष हरिश्चंद्र लोंढे, एल. आर. राव, श्रीकृष्ण बेडसे, दीपक सोनवणे, मनोहर हातेकर, धम्मदीप मोरे, जी. डी. जाधव, धनंजय गाळणकर, किशोर शेजवळ, मनोहर मोहिते, आर. जी. अहिरे, मधुकर शिरसाठ, बी. टी. अहिरे, हर्षबोध मोरे, वसंत पाटील, महिंद्र पाटील उपस्थित होते.

### जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह गारपीट

तडाख्याने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. गारपीट व वादळाचा पिकांना मोठा फटका बसला असून अचानक आलेल्य अस्मानी संकटामुळे शेतकरी उध्वस्त झाला आहे. त्यामुळे महसूल व कृषी विभागाने त्वरीत पंचनामा करुन नुकसानीचा अहवाल शासनास सादर करावा. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी सरकारकडे प्रयत्न करणार असल्याचे मा.आ. कुणाल पाटील यांनी सांगितले आहे.शेतकऱ्यांच्या या संकटात मी त्यांच्यासोबत असून बळीराजाने धीर सोडू नये असेही आवाहन मा.आ.क्पाटील यांनी केले आहे. कुसूंबा, नेर, आनंदखेडे, वार, कुंडाणे, देऊर, लोहगड, लोणेखेडी, उडाणे, गोताणे, चौगाव, नगाव,मोराणे या गावांसह धुळे तालुक्यातील विविध भागात गारपीट, वादळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. गारपीटमुळे कांद्याची पात तुटून भूईसपाट झाली आहे तसेच गारपीटीच्या तडाख्यात टरबूजचे मोठे नुकसान झाले आहे. मका, गहू, हरभरा, ज्वारी, बाजरी, पपई, केळी, डाळींब, आंबे, शेवगा यांच्यासह फळपिके व भाजीपाला यांना गारपीटीचा फटका बसला आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हीरावून घेतल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. या नुकसानीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीचा तातडीने पंचनामा करण्याच्या सूचना मा.आ.पाटील यांनी महसूल व कृषी विभागाला दिल्या आहेत. पंचनामा अहवाल तत्काळ सरकारकडे पाठविण्याच्याही सूचना केल्या आहेत. गारपीट,वादळी पावसाने झालेल्या नुकसानीची सरसकट नुकसान भरपाई देण्यासाठी सरकारकडे प्रयत्न करणार असल्याचेही मा.आ.कुणाल पाटील यांनी सांगितले आहे.

### स्वीकृत पाठोपाठ महापालिकेत स्थायी..

महत्वाच्या असलेल्या पदामध्ये स्थायी समितीचे सभापतीपद हे महत्वाचे मानले जाते. किंबहुना महापौराच्या पदाची बरोबरी स्थायी समितीचे सभापतीपद करते. त्यामुळे स्थायी समितीचे सभापतीपद मिळविण्यासाठी निवड झालेले सदस्य आपली सर्व ताकद पणाला लावण्याची श्नयता आहे. त्यात कृपेश नांद्रे, अमोल मासुळे, लताबाई सोनार, निलेश नेमाणे, यांची नावे चर्चेत आहेत.

महापालिकेच्या महिला-बालकल्याण समितीच्या अकरा सदस्यांची निवड सोमवारी करण्यात आली. त्यात भाजपच्या सात सदस्यांचा, राष्ट्रवादी-शिवसेना शिंदे गटाच्या दोन आणि एम.आय.एम. च्या दोन सदस्यांचा समावेश आहे. महिला बालकल्याण समितीचे सभापतीपद मिळविण्यासाठी सत्ताधारी भाजपच्या सदस्यांमध्ये रस्सीखेच असणार आहे. त्यात वैभवी दुसाणे, संध्या कदम, मिनल परदेशी यांची नावे चर्चेत आहेत. सोमवारी स्विकृत नगरसेवक, स्थायी समिती आणि महिला बालकल्याण समितीच्या सदस्यांची निवड झाली. ज्यांची निवड झाली, त्यांच्या समर्थकांनी महापालिका इमारतीच्या आवारात ढोलताशे वाजवीत आनंद व्यक्त केला.

### पिंपळनेर परिसरात मुसळधार पाऊस

केली आहे. हातातोंडाशी आलेला घास या अवकाळी पावसामुळे हिरावला जातो की काय, अशी भीती शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. ढगाळ हवामान अजूनही कायम असल्याने काढणीला वेग आला असला तरी,पावसाच्या अनिश्चिततेमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. प्रशासनाने या नुकसानीचे त्वरित पंचनामे करावेत, अशी मागणी शेतकऱ्यांकडुन होत आहे.सध्या रब्बी हंगामातील गहू आणि हरभरा या पिकांच्या काढणीचा हंगाम अंतिम टप्प्यात आहे. अनेक ठिकाणी ही पिके काढणीसाठी तयार आहेत, तर काही ठिकाणी मळणीची कामे सुरू आहेत.अशा स्थितीत आलेल्या पावसामुळे गहू, हरभरा काढणीला आलेली पिके भिजल्याने दाण्यांचा दर्जा खराब होण्याची शक्यता आहे. तालुक्यातील नांदवण परिसरात अवकाळीचा मोठा तड़का बसला. सुमारे तासभर झालेल्या पावसामुळे साक्री, पिंपळनेर, देशशिरवाडे, चिकसे, उंभरे, शेगांव, बल्हाणे, शेवगे, शेलबारी परिसरातील कांदा पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. परिसरातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना या अवकाळी पावसाचा फटका बसला.शेतात साठवून ठेवलेला माल सुरक्षित ठेवण्यासाठी शेतकरी ताडपत्रीचा आधार घेत असून, पावसापासून पीक वाचवण्यासाठी मोठी धडपड सुरू होती.

## शिरपूर बसस्थानकात पोलिसांसमोर वाहक-प्रवाशांमध्ये झाली मारहाण

**धुळे, दि.३०- शिरपूर बसस्थानकावर प्रवासी आणि बस मधील वाहक यांच्यात सोमवारी सकाळी दहाच्या सुमारास फ्री-स्टाईल हाणामारी झाली. यावेळी चिडलेल्या प्रवाशांनी केलेल्या मारहाणीत आणि धरपकडीत वाहकाचे कपडे फाटले. शिंदखेड्याहून शिरपूरकडे बस धावत असताना वाहक अश्लील शिवीगाळ करीत होता. तसेच वाहक दारूच्या नशेत असल्याचे सांगण्यात आले. मारहाणीनंतर पोलिसांनी हस्तक्षेप केला.**

परिवहन महामंडळाच्या बससेवेबाबत अनेक तक्रारी वाढल्या आहेत. अनेक बस चालक आणि वाहक कामावर असताना दारूच्या नशेत असतात, अशी ओरड आहे. त्याबाबत परिवहन मंत्र्यांनी कर्मचाऱ्यांची काम सुरू होण्यापुर्वी वैद्यकीय तपासणी होईल, असे सांगितले. तरी देखील कर्मचाऱ्यांच्या स्वैराचारात काहीच बदल झालेला नाही, असे शिरपूर बसस्थानकात घडलेल्या घटनेवरून दिसते. शिरपूर बसस्थानकात सोमवारी सकाळी काही प्रवाशांनी वाहकास बेदम मारहाण केली. त्यात त्याचे कपडे फाटले. वाहकाने केलेल्या मारहाणीत एक मध्यमवयस्क व्यक्तीला जखमा झाल्या आणि काही प्रमाणात रक्तस्त्राव झाला. वेळी एक पोलिस कर्मचारी तेथे आला. पण, त्या कर्मचाऱ्याकडून फार काही झाले नाही. कोणीतरी पोलिस ठाण्यास माहिती दिली. त्यानंतर काही काळाने काही पोलिस कर्मचारी बसस्थानकाच्या आवारात आले. नागरीकांनी दिलेल्या माहिती प्रमाणे वाहक दारूच्या नशेत आहे. नरडाणा येथून शिरपूरकडे बस धावत असताना चालकांने अश्लील शिवीगाळ करण्यास सुरूवात केली. तेव्हा, बसमध्ये महिला आहेत. तुम्ही अश्लील शब्दप्रयोग करू नका, असे काहींनी सांगितले. पण, वाहक ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. शिरपूर बसस्थानक आल्यानंतर त्याने पुन्हा शिवीगाळ केली आणि त्यानंतर फ्री-स्टाईल मारामारी झाली. गुन्हा दाखल झाल्यानंतर माहिती दिली जाईल, सध्या तपास सुरू आहे, असे ठेवणीतील उत्तर देत पोलिस कर्मचाऱ्यांनी वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला.

## आरोग्य कर्मचाऱ्यांच्या कन्येला देण्यात आली एचपीव्ही लस; प्रेरणादायी आदर्श



**धुळे, दि.३०- धुळे महानगर पालिकेमार्फत राबविण्यात येत असलेल्या एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा उद्देश मुलींना गर्भाशयाच्या कर्करोगापासून संरक्षण देणे हा असून, ना. प्रा. आ. केंद्र, नंदिरोड अंतर्गत कार्यरत कोमल बांगर यांची कन्या देवयानी हिने एच पीव्ही लस घेऊन समाजासमोर सकारात्मक व प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले. सदर लसीकरण कमलाबाई कन्या शाळा अंतर्गत पार पडले. या मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.**

विशेष म्हणजे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या कुटुंबातील मुलींना लस देऊन नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करण्याचा आदर्श पुढाकार घेतला आहे. देवयानी हिने एचपीव्ही लस घेऊन पहिले आपण मग समाज हा संदेश देत इतर पालक व विद्यार्थिनींना लसीकरणासाठी प्रोत्साहन दिले आहे. आरोग्य विभागाच्या वतीने शाळांमध्ये जनजागृती व समुपदेशन केले जात असून मुलींच्या सुरक्षित व निरोगी भविष्यासाठी हा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. एचपीव्ही लस ही गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण देणारी सुरक्षित व प्रभावी लस असून पात्र वयोगटातील मुलींनी या लसीकरणाचा लाभ घेणे अत्यंत आवश्यक आहे. सर्व पालक व विद्यार्थिनींनी जवळच्या महानगरपालिका आरोग्य केंद्रात भेट देऊन एचपीव्ही लसीकरण करून घ्यावे व या जनजागृती मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा. असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

### बातमीसंदर्भात खुलासा

(पान १ वरुन) खबर दिली व पोलिसांच्या कामात मदत केली. यावेळी हा मृतदेह कुणाचा आहे याचा तपास लागला नव्हता. याप्रकरणी मोहाडी पोलिसांनी सखोल चौकशी केली असता मृत व्यक्तीचे नाव रवि यशवंत मालचे (वय ३५) रा.दिवाणमळा ह.मु.अवधान ता.जि.धुळे असे असल्याचे स्पष्ट झाले. मयताच्या नातेवाईकांनी ओळख पटवून त्यांचा अंत्यविधी आटोपण्यात आला आहे.

## धुळे जिल्ह्यात मनाई आदेश

धुळे, दि.३०- धुळे जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबादीत राखण्यासाठी १ ते १५ एप्रिल या कालावधीत प्रतिबंधात्मक मनाई आदेश मुंबई पोलिस कायदा कलम ३७ (१) (३) अन्वये लागू राहतील, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी शरद पवार यांनी दिले आहेत. सदरचे आदेश पाच पेक्षा जास्त व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही मंडळीस किंवा मिरवणूकीस मनाई करील. या कालावधीत सभा, मिरवणूका, मोर्चा, मिटींग कार्यक्रम व रॅली इत्यादी परवानगीबाबत स्थानिक पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी कायदा व सुव्यवस्था राखणेबाबत योग्य तो निर्णय घेऊन परवानगी घ्यावी. तसेच लग्नकार्य किंवा प्रेतयात्रेच्या जमावास शासनाने वेळोवेळी दिलेले निर्बंध लागू असतील. हा आदेश १ एप्रिल रोजीच्या १ वाजेपासून ते १५ एप्रिल रोजीच्या रात्री ११.५५ वाजेपर्यंत लागू राहील. असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## प्रभाग एकोणावीस मध्ये सुविधांअभावी नागरिक त्रस्त समस्या दूर करण्यासाठी आझाद हिंद संघटनेचे आंदोलन

**धुळे, दि.३०- शहरातील प्रभाग क्र.१९ मध्ये नागरी सुविधांचा अभाव असल्याने परिसरातील जनतेला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते आहे. समस्यांचे तात्काळ दूर करण्यात याव्यात. या मागणीचे निवेदन आझाद हिंद संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मनपा आयुक्त नितीन कापडणीस यांना दिले.**



निवेदनात नमुद केले आहे की, प्रभाग क्र.१९ येथे अमृत २ योजनेचे काम पूर्णपणे बंद पडले असून त्यासाठी संबंधित अधिकारी, प्रभागातील नगरसेवक जबाबदार असून राजकारणामुळे योजना रखडली आहे. घंटागाड्या वेळेवर येत नसल्याने मोठ्याप्रमाणावर कचऱ्याचे ढिग लागले आहेत. कचरा ठेकेदारा अधिकाऱ्यांशी संगनमत करून कामाचा कोणताही ठोस पुरावा नसतांनाही बिले काढून घेत आहेत. प्रत्यक्षात काम करतांना कोणी दिसत नाही. मनपाने एक दिवसाआड पाणी पुरवठा करण्याचे आश्वासन दिले होते. नियोजनाअभावी आजही नागरिकांना आठ ते दहा दिवसांनंतर पाणी मिळत आहे. प्रभागातील पन्नास टक्के पथदिवे बंद असून विद्युत विभागाचे एन.के.बागुल यांना वारंवार संपर्क साधल्यानंतर फोन न उचलणे, उडवा उडवीची उत्तरे देण्यात आली. अनेक दिवसांपासून विविध मागण्यांसाठी पाठपुरावा करण्यात आला. मागण्यांची दखल न घेतल्याने महापालिकेत ठिय्या आंदोलन करण्यात आले. या आंदोलना प्रसंगी आझाद हिंद संघटनेचे रफीक शा पठाण, रफीक काजी, शाहरूख शाह, साबीर शेख, उस्मान शाह, अल्ताफ सय्यद, आदील शाह, नोमान शाह, हसन शेख, इमरान शाह, शाकीब पिंजारी, सुल्तान शाह, बब्बु अन्सारी, शाह उपस्थित होते.

## शिंदखेड्यातील लेंडीनाला बंदिस्त करण्याची मंत्र्यांकडे झाली मागणी

**धुळे, दि.३०- शिंदखेडा येथील पोलिस ठाण्यापासून एकलव्य नगरापर्यंतच्या टप्प्यात लेंडी नाला बंदिस्त करण्याबाबत लवकरच शासकीय यंत्रणेला सुचना केल्या जातील, असे आश्वासन पालकमंत्री जयकुमार रावल यांनी दिले. यासाठी नगरसेविका शितल सोनवणे, गुलाब सोनवणे आणि इतरांनी मंत्री रावल यांना निवदेन दिले होते. नाला खुल्या असल्याने या टप्प्यात नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. पावसाळ्यात जास्त त्रास होतो, असे सांगण्यात आले.**



जिल्ह्यात तापमानाचा पारा चाळीस अंशाकडे झेपावत असताना राज्यातील काही भागात बेमोसमी पाऊस होत आहे. त्यामुळे अनेकांना आपल्याकडील बेमोसमी पाऊस आणि पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या परिस्थितीचे स्मरण होत आहे. त्याला शिंदखेडा येथील परिस्थिती अपवाद नाही. शिंदखेडा येथे पोलिस ठाण्यापासून एकलव्य नगराकडे जाणाऱ्या भागातून लेंडी नाला वाहतो. नाल्याचे पात्र खुले असल्याने पावसाळ्यात या भागात अनेक समस्या निर्माण होतात. नागरिकांना पार पार करणे कठीण होते. अशा परिस्थितीत नाला बंदिस्त झाला पाहिजे, अशी मागणी नागरिकांची आहे. त्यासाठी नगरसेविका शितल सोनवणे, गुलाब सोनवणे आणि इतरांनी पालकमंत्री जयकुमार रावल यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. नागरिकांच्या सोयीसाठी लेंडी नाला बंदिस्त होणे आवश्यक आहे. त्यासाठी आपण प्रयत्न करावेत, अशा आशयाचे निवेदन मंत्री रावल यांना देण्यात आले. निवेदन आणि प्रत्यक्ष स्थितीची माहिती घेतल्यानंतर मंत्री रावल यांनी नाला बंदिस्त करण्याबाबत शासकीय यंत्रणेला आदेशित केले जाईल. पावसाळ्यापुर्वी नाला बंदिस्त करता येईल का, असा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी दिले. निवेदन देताना गुलाब सोनवणे यांच्यासोबत, शाम सोनवणे, सुखदेव सोनवणे, ज्योतीराम सोनवणे, भास्कर सूर्यवंशी, विश्वास महाजन, रवींद्र मोरे, अनिल पवार, नरेश सोनवणे, शंकर सूर्यवंशी, शंकर भिल, पंडित फुले, आनंद सोनवणे उपस्थित होते.

## बिलाडीजवळ ट्रकची धडक: कामगार ठार

धुळे, दि.३०- धुळे तालुक्यातील बिलाडी गावाच्या शिवारात शेतात सुरू असलेल्या कामावर कार्यरत असलेल्या कामगाराला भरधाव वेगाने जाणाऱ्या ट्रकने धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात कामगाराचा गंभीर जखमी होवून मृत्यू झाला आहे.मो.इब्राहीम मो.सिद्दीकी यांनी दि.२९ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, बिहार राज्यातील रमजानी बुदमा टोला रूपोली दक्षिण वार्ड नं.७ येथील रहिवासी मो.परवेज मो. मुस्तकीन(वय २२) हा मजुर बिलाडी गावाजवळील नारायण ठाकरे यांच्या शेतात सुरू असलेल्या विक्रम इंफ्रा. प्रा.लि. राजस्थान कंपनीच्या कंस्ट्रक्शन साईडवर काम करत असतांना दि.२९ मार्च रोजी दुपारी दीड वाजेच्या सुमारास भरधाव वेगाने जाणारा ट्रक क्र.आरजे २३/जीसी-६५६५ ने मागुन धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात मो. परवेज मो. मुस्तकीन हा मजुर गंभीर जखमी होवून त्याचा मृत्यू झाला.

### निधन वार्ता

#### अरविंद नांदोडे



सोनगीर दि.३०- येथील एन जी बागुल हायस्कूलचे सेवानिवृत्त कला शिक्षक अरविंद आत्माराम नांदोडे (वय ८२) यांचे सोमवारी दुपारी अल्पशा आजाराने येथे निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा मंगळवार दि.३१ रोजी सकाळी ९ वाजता गुलाब बाबा मंदिरा जवळील राहत्या घरून निघेल. प्रदीप नांदोडे, हेमंत नांदोडे, सेवानिवृत्त शिक्षिका माधुरी भावसार यांचे ते वडील तर पत्रकार सतीश भावसार यांचे सासरे होत.


**हॉल भाड्याने/कराराने देणे**

कार्यालय, कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट, अभ्यासिका, इन्शूरन्स कंपनी इ.साठी १३०० स्क्वे.फूटचा हॉल भाडे किंवा कराराने देणे आहे.
-: संपर्क :-
9421413721


### ३१ वा स्मृतीदिन



**स्व. लिलाबाई पंडीत बडगुजर**

(स्वर्गवास दि. ३१/३/१९९५)

राहील आठवण सदा तुमची लाभो तुमच्या आत्म्यास शांती हीच विनंती परमेश्वरासी तुमच्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली व सुमनांजली.

* शोकाकुल *

श्री.सुभाष पंडीत श्री.संजीव पंडीत श्री.मनोज पंडीत (मुले)
श्रीमती कुसूम विजय (सून) सौ.कल्पना सुभाष (सून)
सौ.माधुरी संजीव (सून) सौ.वंदना मनोज (सून)
सौ.शालिनी सुरेश (बहीण) सौ.जयश्री पुरुषोत्तम (बहीण)
नातू- रितीकेश, भुषण, अमोल, विशाल, वैभव, धनंजय, चेतन, शुभम
सौ.प्रिती अनिलराव (नात) सौ.प्रिया विनायकराव (नात)
सौ.पुजा राहुलराव बडगुजर (नातसून) सौ.कल्पना रितीकेश (नातसून)
सौ.सपना भुषण (नातसून) सौ.कामिनी अमोल (नातसून)
सौ.रुपाली विशाल (नातसून) सौ.साईली धनंजय (नातसून)
सौ.वैशाली चेतन (नातसून) सौ.अंकिता शुभम (नातसून)

**समस्त रघुवंशी परिवार**


**पाहिजेत**

मेडीकल कामासाठी मुलगा/मुलगी पाहिजे.
छत्रपती मेडीकल
इंद्रप्रस्थ नगर, प्लॉट नं.४, अमोल नगर बोर्डा समोर, नकाणेरोड, धुळे
7378887166
9637962496

**पाहिजेत**

M.D.F. कटींग साठी माणसे पाहिजे तसेच फोटो फ्रेमिंगसाठी माणूस/महिला पाहिजे.
-: संपर्क :-
7057005373
8554093379

**पाहिजेत**

- नर्स (ANM GNM)
- R.M.O
- रिसेप्शनिस्ट
- B.Sc.ऑप्टोमेट्रीस्ट

संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

**शेतकरी माल खरेदी**

शेतकरी गहू, मका, ज्वारी व इतर शेतकरी माल कोणत्याही खर्चाशिवाय MIDC धुळे येथे खरेदी सुरु आहे.
-: संपर्क :-
9403453061
9673942025

**फ्लॅट भाड्याने देणे**

टू बी एचके फ्लॅट भाड्याने देणे आहे.
नंदाई अपार्टमेंन्टस् फ्लॅट नं.६६, नेहरू हौसिंग सोसायटी, नवरंग पाण्याच्या टाकीजवळ, देवपूर, धुळे
-: संपर्क :-
9423979671
9730782843

**भाड्याने देणे आहे**

सुमन आर्केड मागील बाजू बालाजी मंदिरा जवळ, गल्ली नं.४, तळमजला ४७४ स्क्वे. फूट जागा भाड्याने देणे आहे.
-: संपर्क :-
9422479492

**पाहिजेत**

एमआयडीसी येथे फॅक्टरीसाठी सुपरवायझर, अकौन्टंट, कामगार पाहिजेत.
-: संपर्क :-
9130397130

**भाडे कराराने देणे**

ग.नं.५ किसन बत्ती खुंट येथील ३ मजली इमारत व्यवसाय/होलसेल व्यवसाय करिता वाजवी भाडे कराराने देणे आहे.
-: संपर्क :-
9420851253

**पाहिजे**

घरकामासाठी गरजू महिला पाहिजे. प्रत्यक्षच भेटण्याची वेळ सकाळी ९ ते १
पत्ता : सौमित्र बंगला, हॉटेल चूल आंगनच्या मागे, देवपूर, धुळे
रविंद्र शेलकर
9422285381

**कुलिंग इंडिया की पहचान**

Symphony | Crompton

आत्ता पर्यंतच्या कुलर्सच्या तुलनेत सर्वात स्टायलिश मॉडेल्स्'



आता खरेदी करा कूलर ०% EMI वर

BAJAJ FINSERV 0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.

नियम व अटी लागू*

ak media- 238222

58 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०